<u>(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)</u>

**[(1995) 3 एस. सी. आर. 109]**

**भागचंद सिंधी यांची विधवा दादनबाई**

**-विरुद्ध -**

**अर्जुनदास**

**31 मार्च 1995**

**(न्यायमूर्ति आर. एम. सहाय आणि न्यायमूर्ति एस. बी. मजमुदार.)**

***मध्य प्रदेश निवास नियंत्रण कायदा, 1961 : कलम 23 ए (बी)***

पट्टाकार – पट्टेदाराद्वारे हक्क विवादित नाही – असा पट्टाकार हा ज्याप्रसंगी मालक असतो, अशाप्रसंगी बेदखल करण्याची याचिका योग्य आहे.

**ती जागा महापालिकेची असल्याने, अपीलकर्त्याने दाखल केलेली निष्कान याचिका ती मालक नसल्याच्या कारणावरून उच्च न्यायालयाने फेटाळून लावली.**

**आक्षेपित आदेश रद्द करून या न्यायालयाने प्रकरण उच्च न्यायालयाकडे वर्ग केले.**

*असे मान्य करण्यात आले की:* **ज्या पट्टेकाराचा मालकी हक्क पट्टेदाराकडून विवादित नाही तो निःसंशयपणे मालक आहे ज्यांच्याविरुद्ध निष्कासित करण्याची कार्यवाही चालू ठेवण्यायोग्य होती. त्यामुळे उच्च न्यायालयाने अपीलार्थीच्या बाजूने दिलेला हुकूमनामा रद्द करण्याचे समर्थन केले नाही. (110-बी]**

**दिवाणी अपिलीय न्यायधिकारीता :** दिवाणी अपील क्र. 4183/1995.

मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने दिनांक 21/07/1989 रोजी दिवाणी पुनरीक्षण याचिका क्रमांक 481/1989 मधील निकाल आणि आदेशानुसार.

**अपीलार्थीसाठी :** डॉ. एन. एम. घटाटे, एस. व्ही. देशपांडे आणि प्रमित सक्सेना.

**उत्तरवादीसाठी :** एस. के. अग्निहोत्री.

न्यायालयाद्वारे खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात आला :

पक्षकारांच्या वकिलांचे म्हणणे ऐकले. घरमालकीण पट्टेकार यांनी दाखल

केलेली निष्कासन याचिका जरी तीने परिसर महापालिकेचा होता हे स्वीकृत केले होते तरी ती घर मालकीण नाही या करणास्तव उच्च न्यायालयाने खारीज  केली. मध्य प्रदेश निवास नियंत्रण कायद्याच्या कलम 23-ए (बी) मध्ये वापरलेला 'मालक' या शब्दाचा अर्थ संकुचितपणे मांडला गेला आहे. पट्टेकार ज्याचे हक्क पट्टेदाराने विवादित केलेके नाही असा पट्टेकार निःसंशयपणे मालक आहे,  जीच्याविरुद्ध निष्कासित करण्याची कार्यवाही चालू ठेवण्यायोग्य होती. ही जागा महापालिकेची असल्याच्या कारणावरून जमीनमालकाच्या बाजूने मंजूर करण्यात आलेला हुकूमनामा रद्द करणे उच्च न्यायालयाने योग्य नाही. त्यामुळे कार्यवाही सुरू ठेवता आली नाही.

त्यानुसार उच्च न्यायालयाचा आदेश रद्दबातल करण्यात येतो. कायद्यानुसार आणि गुणवत्तेनुसार शक्य तितक्या लवकर निर्णय घेण्यासाठी हे प्रकरण पुन्हा उच्च न्यायालयाकडे पाठवले गेले.

अपील निकाली काढण्यात येते.

**अपील निकाली काढण्यात येते.**

<u>**अस्वीकरण**</u>

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x